# अमेरिकेमध्ये सर्टिफाइड पुरोहित बना...

अमेरिकेतील मराठी बंधु-भगिनींसाठी

# पौरोहित्य प्रवीण ऑनलाईन अभ्यासक्रम



२२ मार्च ते २३ जुलै २०२३

दर शनिवार – रविवार

PT: 7am to 8.30am

ET: 10am to 11.30am

आचार्य

## सोमयाजी सुहोता आपटे अग्निहोत्री

* आपटे घराण्याला २०० वर्षांची पौरोहित्य आणि याज्ञिकी परंपरा
* महासोमयाग फेब्रुवारी २०२३ यज्ञाचे मुख्य यजमान

Accredited in the USA by IACDSC

Useful for Employment in USA

## ऑनलाईन प्रवेश घ्या

परिचय श्रेणी उत्तीर्ण केलेल्या वा पौरोहित्याचे प्राथमिक ज्ञान असणाऱ्या महिला पुरुष सर्वांना प्रवेश

वयोमर्यादा : वय वर्ष १५ च्या पुढे । मर्यादित जागा । त्वरित प्रवेश घ्या

- हिंदू धर्मशास्त्र पूजा - उपासना पद्धती, विवाह संस्कार, विद्या संस्कार, गृह प्रवेश, नवीन वाहन पूजन
- वास्तू शांत, उदकशांत, गृह शांती, नक्षत्रशांती, जननशांती, गणेश स्थापना, सत्यनारायण, घटस्थापना
- अंत्य संस्कार, श्राद्ध विधी, Grief Counselling
- झूमद्वारे लाईव्ह क्लास + रेकॉर्डिंग उपलब्ध

भीष्म स्कूल ऑफ इंडिक स्टडीज

आणि विश्व मराठी परिषद

अधिक माहिती व नोंदणीसाठी

www.vishwamarathiparishad.org/paurohitya-pravin

+1-6503151128

+1-6508105252

# पौरोहित्य प्रवीण स्तर

**पार्श्वभूमी :** भारतीय जीवन परंपरेचा पाया म्हणजे सनातन वैदिक संस्कार आणि संस्कृती आहे. दैनंदिन आणि नैमित्तिक पूजा, उपासना हा भारतीय कुटुंब व्यवस्थेचा भाग आहे. मानसिक शांती, समाधान आणि अपार आनंददायी पूजाविधी ही एक ध्यान पद्धती आहे. पृथ्वी, आप, अग्नी, वायू व आकाश हे महत्त्वाचे पंचमहाभौतिक घटक मानवी जीवन सुसह्य करतात. या घटकांमध्ये पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. 'आपो वै सर्वादिवता:' या वचनानुसार पाण्यामध्ये सर्व देवता निवास करतात. या जलदेवतेमध्येच सर्व देवतांचे आवाहन करून त्याचे पूजन करणे आणि विशिष्ट मंत्रांनी ते जल अभिमंत्रित करून त्या पाण्याने विविध उपद्रवांचे शमन केले जाते अथवा उपद्रव नष्ट केला जातो. या विधीला उदकशांति असे म्हणतात. वास्तुशुद्धीसाठी तसेच अनेक असाध्य रोगांचे त्रास कमी करणे, धनधान्य समृद्धी, व्यवसायात यश, व्यवसाय वृद्धी अशा अनेक गोष्टींसाठी उदकशांति केली जाते. नवीन गृहप्रवेशाच्या वेळी वास्तुशांतीचा मुहूर्त नसल्यास उदकशांति करून नवीन वास्तूत निवास करता येतो. कौटुंबिक स्वास्थ्य हरवणे, संपत्ती न टिकणे, वारंवार आजारपण, नोकरी - व्यवसायात सातत्य नसणे, कुटुंबात कलह, मुलांची अपेक्षित प्रगती न होणे, त्विवाह न होणे, घटस्फोट, अशा अनेक दोषांचे संतुलन उदकशांति केल्याने होते असे शास्त्र सांगते. कुटुंबातील व्यक्तीचे निधन झाले तर निधनानंतर तेराव्या किंवा चौदाव्या दिवशी वास्तुशुद्धीसाठी उदकशांति केली जाते. एखाद्या बालकाचा जन्म ठराविक तिथी, नक्षत्र, योग, करण आदि दूषित काळात झाला असेल तर सृष्टीतील पंचमहाभौतिक घटकांची वैश्विक ऊर्जा त्याला पुरेशी मिळत नाही आणि त्या बालकाचा विकास नीट होत नाही. म्हणून जनन शांती करावी लागते, असे प्राचीन शास्त्र सांगते. याबरोबरच सर्व रोग निवारण शांती, ग्रहशांती, नक्षत्रशांती असे अनेक शांतीविधी, विवाहविधी, लघुरुद्र इत्यादी पूजाविधी पौरोहित्य प्रवीण या अभ्यासक्रमात आपल्याला शिकता येणार आहेत. ज्यायोगे आपल्याला यजमानांसाठी या पूजा, विधी, शांती ई. पुराणोक्त पद्धतीने विधीवत करता येतील.

**दक्षिणा :** अमेरिकेमध्ये पुरोहित म्हणून कोणत्याही छोट्या मोठ्या धार्मिक विधीसाठी किमान दक्षिणा USD 150 अशी असू शकते. विधीनुसार आणि यजमानांच्या परिस्थितीनुसार दक्षिणा 300 ते 1000 USD अशी अपेक्षित असू शकते.

**पौरोहित्य कार्य :** भारतीय समाज पिढ्यानपिढ्या धार्मिक प्रवृत्तीचा आहे. भारतीय जीवन परंपरेचा पाया म्हणजे सनातन वैदिक संस्कार आणि संस्कृती आहे. देवतापूजन, उपासना आणि पूजा पद्धती हा एकूणच भारतीय माणसाचा स्थायीभाव आहे. दैनंदिन पूजा तसेच नैमित्तिक पूजा हा भारतीय कुटुंब व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. पूर्वीच्या काळी आणि काही कुटुंबांमध्ये आजही दैनंदिन पूजन हा दिनचर्येचा एक अविभाज्य भाग होता, आहे. भारतीय मानस मुळातच श्रद्धाळू आणि आस्तिक मनोवृत्तीचे आहे. पृथ्वीवर आपले वास्तव्य असताना सर्व प्रकारच्या अधिभौतिक आणि अधिदैविक शक्तींची आपल्यावर कृपा असावी, त्यांचे आशीर्वाद आपल्याला मिळावेत आणि आपले जीवन सुखमय, आनंदमय आणि चैतन्यमय व्हावे अशी धारणा आहे. देवतांची पूजा आणि उपासना मनाला, बुद्धीला आणि चित्ताला अपार आनंद देणारा अनुभव आहे. त्यातून होणारे एका प्रकारचे ध्यान आणि पूजेमध्ये रममाण होणे हा अत्युच्च आनंद आहे. वैयक्तिक पूजा आणि सामूहिक पूजा पारंपरिक पद्धतीमध्ये विकसित होत गेल्या. त्यातूनच पूजा आणि उपासना तंत्रातील तज्ज्ञ अशा पुरोहित यांच्या सहकार्याने वैयक्तिक यजमान म्हणून आपल्या घरांमध्ये तसेच सामूहिक पूजा करण्याची परंपरा निर्माण झाली.

आज भारतीयांनी विविध क्षेत्रांमध्ये खूप मोठी प्रगती केली आहे. सातासमुद्रापलीकडे म्हणजे अमेरिका, युरोप, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आदि खंडांमध्ये त्यांनी वास्तव्य केलेले आहे. काळाच्या या प्रवाहामध्ये गतिमान जीवनपद्धतीमुळे दैनंदिन पूजा आणि उपासना यांची आपली थोडी फारकत झाली आहे. विशेषतः अमेरिकेसारख्या देशामध्ये नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने वास्तव्य करून असलेल्या मराठी बांधवांना याची निकड जाणवत आहे. सत्यनारायण पूजा, वास्तूशांत, विवाह, गृहयज्ञ, नक्षत्रशांती इ. साठी मराठी पुरोहित मिळणे थोडे अवघड झाले आहे. प्रा. क्षितिज पाटुकले यांच्या संकल्पनेतून भीष्म स्कूल ऑफ इंडिक स्टडीज आणि विश्व मराठी परिषद यांनी ऑनलाईन पौरोहित्य अभ्यासक्रम सुरु केले आहेत. प्रख्यात विदुषी, व्यासंगी प्रवचनकार आदरणीय कल्याणीताई नामजोशी आणि पद्मभूषण डॉ.विजय भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासक्रम तयार केला आहे. प. पू. स्वामी गोविंददेवगिरि महाराज, कोषाध्यक्ष, श्रीरामजन्मभूमी न्यास, अयोध्या यांचे आशीर्वाद या उपक्रमासाठी लाभले आहेत. अमेरिकेतील सुप्रसिद्ध कीर्तनकार सौ. रश्मीताई बर्वे आणि त्यांचे यजमान श्री. नितीन बर्वे यासाठी समन्वयाचे काम पाहणार आहेत.

**Accreditation** : हा अभ्यासक्रम अमेरिकेमध्ये IACDSC, USA संस्थेद्वारा accredited आहे. त्यामुळे Certified Purohit म्हणून काम करता येईल. तसेच विविध मंदिरे, धार्मिक सामाजिक संस्था, हॉस्पिटल्स, महाविद्यालये, विद्यापीठे यासाठी तसेच Faith counselor, Hindu Dharma Counsellor Marriage counsellor, Grief counsellor म्हणून काम करता येईल.

**ग्रीन कार्ड होल्डर्स आणि H 1 B एच वन बी व्हिसाधारकांना :** हा अभ्यासक्रम एक समांतर करिअर म्हणून उपयुक्त आहे.

**अमेरिकेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी :** हा अभ्यासक्रम अतिशय उपयुक्त आहे त्यामुळे चांगल्या अर्थार्जनाची संधी मिळेल तसेच ओळखी वाढण्यास आणि नेटवर्किंग साठी उपयुक्त ठरेल.

## अभ्यासक्रमाची माहिती :

**ऑनलाईन पौरोहित्य अभ्यासक्रम एकूण दोन स्तरावर चालणार आहे.** १) परिचय स्तर २) प्रवीण स्तर. परिचय स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या वा पौरोहित्याचे प्राथमिक ज्ञान असणाऱ्या इच्छुक लोकांसाठी गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरु करीत आहोत प्रवीण स्तर! **हा अभ्यासक्रम 'पुराणोक्त पद्धती' वर आधारित आहे.**

## प्रवीण स्तर अभ्यासक्रमातील समाविष्ट घटक :



१) षोडषोपचार पूजा पद्धती, पूजा साहित्य आणि पूजेची तयारी

२) पूजा विधान - संकल्प, आवाहन, प्रतिष्ठापना, समाप्ती

३) श्री गणेश प्रतिष्ठापना, गौरी प्रतिष्ठापना, विसर्जन, घटस्थापना, कुमारीपूजन इ.

४) वास्तुशांती, उदक शांती, ग्रहशांती, नक्षत्र शांती

५) विवाह ६) लघुरुद्र ७) अंत्यसंस्कार

८) पाठांतर आणि उजळणी, शंका निवारणाचे सत्र

९) अचूक संस्कृत उच्चारण आणि संथा

१०) अभ्यास साहित्य (ई बुक फॉर्म मध्ये)

११) ऑनलाईन परीक्षा

१२) रेकॉर्डिंग उपलब्ध

## प्रवेशासाठी पात्रता :

१. परिचय श्रेणी उत्तीर्ण केलेल्या वा...

२. पौरोहित्याचे प्राथमिक ज्ञान असणाऱ्या महिला व पुरुषांना मुलाखतीद्वारे प्रवेश देण्यात येईल. निवड झाल्यानंतर 'पौरोहित्य परिचय' या अभ्यासक्रमाचे रेकॉर्डिंग उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी USD 100 एवढे शुल्क भरावे लागेल.

२. वयोमर्यादा १५ वर्षाच्या पुढे; कमाल वयोमर्यादा नाही.



## आचार्यांची ओळख

**पू. श्री. सोमयाजी सुहोता आपटे.**

राहणार म्हापसा, गोवा

यांच्या घरी गेली ६० वर्षे अविरत श्रौत अग्निहोत्र सेवा चालू आहे. त्यांनी कवळे, गोवा येथील वेद पाठशाळेत ५ वर्षे अध्ययन केले आहे. त्याशिवाय यजुर्वेद शाखा अध्ययन केले आहे. त्यांचे संस्कृत शिक्षण झालेले आहे. म्हापसा गावचे ते ग्रामपुरोहित आहेत. म्हापसा येथे त्यांचे घराणे २०० हून अधिक वर्षे वंशपरंपरेने पौरोहित्य आणि याज्ञिकी करीत आहे. सुहोताजी तोच वारसा पुढे चालवत आहेत. त्यांच्या घरातच अग्निहोत्र, देशी गाई आणि छोटेसे परशुरामांचे मंदिर आहे. त्यांची पत्नी त्यांना या कार्यात आत्मीय आणि सक्रिय सहकार्य करीत आहे. **नुकताच गोव्यामध्ये सकाळ माध्यम समूहाने सोमयाजी सुहोता आपटे अग्निहोत्री यांच्या मुख्य यजमान अधिपत्याखाली विश्वशांतीसाठी अग्निष्टोम महासोमयाग हा ६ दिवसांचा यज्ञ उत्सव ५ ते १० फेब्रुवारी दरम्यान आयोजित केला होता. यामध्ये ३६ हून अधिक ब्रह्मवृंद आणि हजारो भाविक सहभागी झाले होते.**

## प्रवीण स्तर पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कोणती कौशल्ये प्राप्त होतील ?

१) पूजा आणि उपासना पद्धती, नवविधा भक्ती यांची माहिती होईल. प्रत्येक पूजेची तयारी कशी करावी, संकल्प कसा करावा आणि पूजा साहित्य कोणते लागते याचे ज्ञान ज्ञान प्राप्त होईल.

षोडषोपचार पूजा पद्धतीची माहिती होईल, षोडषोपचार प्रत्यक्ष पूजा करता येईल. (सोळा उपचारांनी पूजा)

२) गणेशोत्सवामध्ये गणपती, गौरी प्रतिष्ठापना करता येईल. उत्तरपूजा आणि विसर्जन यथासांग करता येईल. घटस्थापना, कुमारीपूजन, कन्यापूजन, सरस्वती पूजन करता येईल.

३) यजमानांच्या घरी पूजा, शांतीविधी करता येतील. शास्त्रशुद्ध, पुराणोक्त पद्धतीने मंत्रोच्चारांसहित वास्तु शांती, उदक शांती, ग्रहशांती, नक्षत्र शांती, लघुरुद्र इत्यादी पूजा विधी स्वत:च्या आणि इतरांच्या घरी आत्मविश्वासाने करता येतील. कुलदेवी, कुलदेवता, कुलोपचार यांचे विषयी माहिती होईल, इतरांना माहिती देता येईल.

४) धार्मिक विधींबाबत मार्गदर्शन करता येईल, प्रबोधन करता येईल, व्याख्याने देता येतील.

५) नवीन भाड्याच्या घरात जातांना गृहप्रवेश पूजा, नवीन वाहनाची पूजा, विद्या आरंभ संस्कार, विद्या संस्कार, वास्तू संस्कार, करता येतील.

६) विविध मंदिरे, धार्मिक, सामाजिक संस्था, हॉस्पिटल्स, महाविद्यालये, विद्यापीठे, इ. ठिकाणी Faith Counsellor, Hindu Dharm Counsellor, Marriage Counsellor, Grief Counsellor म्हणून काम करता येईल.

## अभ्यासक्रम शुल्क :

**प्रवीण स्तर : Invitation Fees - USD 500 /-**

प्रात्यक्षिकांसह ऑनलाईन मार्गदर्शन । ऑनलाईन परिक्षा

प्रत्येकाला प्रमाणपत्र । मर्यादित जागा । ऑनलाईन प्रवेश घ्या

**Zelle Code:** bhishmaindicsusa@gmail.com

**Bank Transfer:** **Name:** Bhishma School of Indic Studies

**Account Number:** 7379511111 **Bank:** Wells Fargo

**Bank Address:** 2300 Homestead Road, Cupertino CA 95014

ऑनलाईन प्रवेशासाठी खालील लिंकवर क्लिक करा

**www.vishwamarathiparishad.org/paurohitya-pravin**

**अभ्यासक्रम नियम :**

- या अभ्यासक्रमातील सर्व सत्रे ऑनलाईन झूम मिटिंग द्वारे आयोजित केली जाणार आहेत.
- दिलेल्या वेळापत्रकामध्ये परिस्थितीप्रमाणे बदल करण्याचे अधिकार आयोजक तसेच मार्गदर्शकांकडे आहेत.
- एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणामुळे रद्द करता येणार नाही तसेच भरलेली रक्कम परत करता येणार नाही. वर्ग सुरु होण्याच्या ४ दिवस अगोदर कळवल्यास बदली व्यक्ती देता येईल अथवा, भविष्यातील बॅच मध्ये ॲडजस्ट करता येईल.
- संपूर्ण माहिती आणि वेळापत्रक इ. वाचल्यानंतरच नोंदणी करावी.
- एकूण अभ्यासक्रमाचे स्टडी मटेरीयल ई-बुक स्वरुपात दिले जाईल.
- न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र ही राहील.

**अभ्यासक्रमात प्रवेश का घ्यावा ?**

- U.S.A मध्ये सर्टिफाईड पुरोहित म्हणून करिअर घडवा.
- पुराणोक्त पद्धतीने सर्व पूजा, शांती विधी करता येतील.
- संस्कृती परंपरा, सण, उत्सव यांची ओळख होईल.
- समांतर करिअर विकसित करायची संधी
- लहानग्यांवर आध्यात्मिक संस्कार
- पौरोहित्य करिअर म्हणून अमेरिकेमध्ये मोठी संधी
- संस्कृती आणि परंपरा यांचे संवर्धक म्हणून सामाजिक प्रतिष्ठा
- संस्कृत भाषा, पाठांतर, स्तोत्रपठण, अग्निहोत्र यामुळे आगळ्यावेगळ्या आनंदाची अनुभूती
- मंदिरे, धार्मिक, सामाजिक क्षेत्रे, हॉस्पिटल्स  इ. ठिकाणी नोकरीची संधी

**संदर्भ ग्रंथ :**

१) लघुपूजाविधी - संपादक - प्रा. रा. ल. जोशी

२) नित्यकर्म - पूजा प्रकाश - पं. लालबिहारी मिश्र

३) अग्निहोत्र - वा. जो. आपटे

४) हवन पुस्तिका

५) अग्निहोत्र - पं. डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी

६) शांती विधान - मधुकर गो. अत्रे

७) यज्ञरहस्यम - बे. शा. सं. कृ. म. बापट शास्त्री

८) निधन शान्ति - प्रभाकर स. पाध्ये

९) चातुर्मास पुस्तिका

१०) कुलदैवत

११) कुळधर्म - कुलाचार - कुलदैवते - गजानन खोले

१२) भारतीय रुढी व परंपरा इ.

१३) मंत्रयज्ञ भाग १ आणि २